बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक १७० वा । शनिवार दिनांक १३ सप्टेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १.५० ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### ॲल्युमिनीयम-इलेक्ट्रिक तारेची केली चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- कळंब पोलीस ठाणे अंतर्गतदि. ०९.०९.२०२५ रोजी मोहा शिवारातील आनंदवाडी इंप्रा प्रा. लि. धाराशिव कंपनीने बसवलेली सात पोलीवरील ॲल्युमिनीयमची इलेक्ट्रिक तार २०० स्केएमएम जाडी लांबी २,३३७ किलो वजनाची अंदाजे ८,३९,१६८ किंमतीचे अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-औदुंबर कैलास पाटील, वय ३२ वर्षे, रा. शिराढोण ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.१०.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध मद्य विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- अपोलीस ठाण अंतर्गत हुसनय्या रा. कदेर ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.११.०९.२०२५ रोजी कदेर येथे बालाजी पाटील यांचे शेतातील पत्राचे शेडसमोर अंदाजे १,८०० किंमतीची ३० लिटर सिंधी ताडी अम्ली द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. तर बळीराम रा.एकुरगा ता. उमरगा जि. धाराशिव हे दि. ११.०९.२०२५ रोजी १ लक्ष्मी पाटी जवळ राज चायनीज सेंटर मध्ये अंदाजे १,३०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १३ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. तर आरोपी नामे-तानाजी गोविंद ढोणे, वय ३२ वर्षे, रा.धाकटीवाडी ता. उमरगा जि. धाराशिव हे दि. ११.०९.२०२५ रोजी १२.३० वा. सु.जय भवानी हॉटेल जवळ धाकटवाडी शिवार येथे अंदाजे ३,००० किंमतीची ३० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर शंकर रा.कोळसुर कल्याण ता. उमरगा जि. धाराशिव हे दि. ११.०९.२०२५ रोजी १८.२८ वा. सु. वडर गल्ली कोळसुर कल्याण येथे अंदाजे १,८०० किंमतीची १८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे स्वतंत्र ४ गुन्हे नोंदविले आहेत.

शिराढोण अपोलीस ठाण अंतर्गत नामे-राम रा. निपाणी ता.कळंब जि. धाराशिव हे दि.११.०९.२०२५ रोजी निपाणी पाटी जवळील हॉटेल तुळजाभवानी चे पत्राचे शेड अंदाजे २,२९२ किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २६ सिलबंद बाटल्या व एक लिटरचे २० फुगे गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर ओमकार रा. मंगरुळ ता. कळंब जि.धाराशिव हे दि.११.०९.२०२५ रोजी ढोकी कळंब रोडवर पश्चिम बाजूस हॉटेल जवळ अंदाजे २,२६५ किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ३३ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये शिराढोण पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

# भाविकांना सौजन्याची वागणूक देऊन यंत्रणांनी आपल्या जबाबदाऱ्या वेळेत पार पाडाव्यात : जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार

## शारदीय नवरात्र महोत्सव तयारीचा आढावा



धाराशिव (जिमाका) -श्री क्षेत्र तुळजापूर येथे होणारा श्री तुळजाभवानी देवीचा शारदीय नवरात्र महोत्सव यंदा २२ सप्टेंबरपासून मोठ्या उत्साहात सुरू होत आहे.परंपरेनुसार १४ सप्टेंबर रोजी देवींची मंचकी निद्रा होणार असून,२२ सप्टेंबर रोजी घटस्थापना होईल.नवरात्र काळात भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांशी कर्मचाऱ्यांनी सौजन्याने वागून यंत्रणांवर सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या वेळेत पार पाडाव्यात.असे निर्देश जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी दिले.

बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील,उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख,तहसीलदार अरविंद बोळंगे,तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने,महंत तुकोजी बुवा,पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमराजे कदम,विपिन शिंदे,अनंत कोंडो तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

श्री.पुजार पुढे म्हणाले की,नवरात्र काळात भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने विविध उपाययोजना आखल्या आहेत.विद्युत विभागाकडून २४ तास अखंडित वीजपुरवठा,सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची कामे,तसेच मराठी,कन्नड आणि तेलगू भाषेत दिशादर्शक फलक बसविण्यात येत आहेत.आरोग्य विभागाकडून सहा प्रमुख मार्गांवर २२ प्रथमोपचार केंद्र साथरोग नियंत्रण पथके व १० बाईक म्ब्युलन्स सज्ज ठेवण्यात येतील. नगर परिषदेकडून स्वच्छता मोहिम, शुद्ध पिण्याचे पाणी,वॉच टॉवर, विश्रांतीगृहे आणि अग्निशमन वाहनांची सोय करण्यात येणार आहे.सिंगल युज प्लास्टिकवर बंदी घालण्यात येत असून,उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल.सुरक्षेसाठी १०२ सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जात असून, भवानी कुंड परिसरात शौचालयांची सोय केली जात असल्याचे श्री.पुजार यांनी सांगितले.

अन्न व औषध प्रशासन विभागाकडून त्यांचे अन्न सुरक्षा अधिकारी कार्यरत राहतील. त्यांनी खाद्यपदार्थांवर काटेकोर देखरेख ठेवावी असे सांगून श्री.पुजार म्हणाले की, भाविकांच्या सुरक्षिततेसाठी २ हजार पोलिस तैनात राहतील तसेच स्वतंत्र वाहतूक नियोजन पथके कार्यरत राहतील.

यावर्षीचा शारदीय नवरात्र महोत्सव स्वच्छता संकल्पनेवर आधारित असेल. देवीच्या दर्शनासाठी आलेला प्रत्येक भाविक सुखरूप घरी जाईपर्यंत त्याची काळजी घेणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.असे श्री.पुजार यावेळी म्हणाले.

यावेळी विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी शारदीय नवरात्र महोत्सवाच्या दृष्टीने सोपवण्यात आलेल्या जबाबदाऱ्या आणि त्याच्या प्रगतीबाबतची माहिती दिली.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कार्यशाळा

# लोकसहभागातून कामे केल्यास गाव समृद्ध होण्यास वेळ लागणार नाही-आमदार कैलास घाडगे पाटील

धाराशिव (जिमाका)- राज्याचा नव्हे तर देशाचा विकास हा गावावरच अवलंबून असतो.त्यामुळे गावस्तरावर आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून सर्वांगीण विकास करणे आवश्यक आहे. तो विकास करताना सरपंच आणि ग्रामसेवक तथा ग्रामविकास अधिकारी यांनी आपसातील सर्व मतभेद विसरून एका नव्या उमेदीने गावच्या विकासासाठी झटून कामे करीत गावयाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करावेत. मात्र,ती कामे करताना सर्व ग्रामस्थांना विश्वासात घेत लोकसहभाग व लोकचळवळीतून केल्यास गावचा विकास होऊन प्रत्येक गाव समृद्ध होण्यास वेळ लागणार नाही.असे प्रतिपादन आमदार कैलास घाडगे पाटील यांनी केले.

आज धाराशिव शहरातील सिध्दाई मंगल कार्यालयात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले, त्यावेळी ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते.यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष,जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष नेताजी पाटील,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) तुकाराम भालके,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) अनंत कुंभार,मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन इगे,उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालकल्याण देवदत्त गिरी,उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज राऊत,टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे गणेश चादरे,आदर्श गाव जेकेकुरवाडीचे सरपंच अमर सुर्यवंशी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना आमदार घाडगे पाटील म्हणाले की,मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान १७ सप्टेंबरपासून राज्यात राबविण्यात येणार आहे. त्यासाठी शासनाच्या विविध विभागांच्या योजना राबवून समृद्ध गाव करणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे ग्रामपंचायतचा कारभार पारदर्शक असणे आवश्यक आहे.त्यामुळे ग्रामसेवक अर्थात ग्रामविकास अधिकारी यांनी देखील ग्रामपंचायतचे रेकार्ड व्यवस्थितपणे ठेवणे गरजेचे आहे.यामध्ये सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन करीत ते म्हणाले की, सगळ्यांचा सहभाग हा निश्चितच उपयोगी ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे आपण आणि खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या फंडातून ग्रामपंचायतला निधी उपलब्ध करुन देण्यात येईल,असे आश्वासन त्यांनी दिले.




जिल्हाधिकारी श्री.पुजार म्हणाले की, जिल्ह्यातील ५३२ गावांमध्ये आपले सरकार केंद्राची जाहिरात काढलेली आहे.त्या माध्यमातून प्रत्येक गावांनी आपले गाव जोडून घ्यावे. तसेच ग्रामस्थांना आवश्यक असलेल्या सर्व प्रमाणपत्राचे वितरण तात्काळ करण्यासह त्या त्या गावातील युवक व युवती यांनी त्या माध्यमातून उद्योजक बनावे,असे आवाहन त्यांनी केले. श्री.पुजार पुढे म्हणाले की,जिल्ह्यामध्ये मुबलक प्रमाणात उद्योग सुरु करण्यासाठी वाव आहे.आधुनिक पद्धतीने शेती करण्यासह त्यासाठी आवश्यक असलेल्या शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा.तसेच पशुपालन व इतर लघु उद्योग सुरु करावेत. याबरोबरच प्रत्येक ग्रामपंचायतीने जास्तीत जास्त विकास कामे करुन आपल्या गावचा विकास साधावा. विशेष म्हणजे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाअंतर्गत आवश्यक त्या सर्व निकषांची पूर्तता करीत राज्यस्तरावरील बक्षिसे खेचून आणून गावचा लौकिक वाढवावा,असे आवाहन त्यांनी केले.

तसेच प्रत्येक सरपंच, ग्रामविकास अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी आठवड्यातून किमान एक वेळेस गावस्तरावर जनता दरबार घेऊन गावातील तक्रारी सोडवाव्यात.जर हा उपक्रम राबविला तर एक देखील तक्रार शिल्लक राहणार नसल्याचे श्री.पुजार यांनी सांगितले. प्रत्येक ग्रामपंचायतने वेबसाईट सुरू करावी.तसेच शाळेला दर्जे दार सुविधा देण्यात येणार असल्याचे सांगून श्री.पुजार म्हणाले की,स्टेटससाठी सीएसआर निधी आणि लोकसहभागाची चळवळ वाढवून जास्तीत जास्त पाणंद रस्ते करावेत. त्याबरोबरच समृद्ध गाव अभियानाअंतर्गत जास्तीत जास्त विकास कामे राबवून जिल्ह्याचा लौकिक वाढवावा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी नेताजी पाटील,महेंद्र बांगर,गणेश चादरे,मनोज राऊत,सचिन इगे,गुरुनाथ भांगे,मेघनाथ पवार,सरपंच अमर सुर्यवंशी, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव आदींसह इतरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यशाळेस जिल्हाभरातील सरपंच, उपसरपंच,सदस्य,सर्व तालुक्याचे गट विकास अधिकारी, जिल्हा परिषदेचे सर्व विभाग प्रमुख,ग्रामसेवक तसेच तालुकास्तरीय सर्व विभाग प्रमुख आदीसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय पंचायत पुरस्कार ग्रामपंचायत धारूर,खानापूर, भंडारवाडी आणि कावलदरा (ता. धाराशिव) तसेच राज्य आदर्श ग्रामपंचायत आदर्श अधिकारी पुरस्कार विजयसिंह नलावडे,भारत सोनवणे आणि नेताजी सांगवे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# मुलीचे अपहरण करणाऱ्यास, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेने ठोकल्या बेड्या

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)-उसतोड कामगार असलेल्या फिर्यादी यांनी वाशी पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली होती की, दि.१८.०३.२०२४ रोजी रात्री चे सुमारास त्यांच्या १५ वर्षीय मुलीस संशईत इसम सुनिल याने अज्ञात कारणावरुन फुस लावून पळवून नेले आहे. यावरुन दिनांक २३.०३.२०२४ रोजी वाशी पोलीस ठाणे येथे कलम ३६३,३७० भा.द.वि. या कलमान्वये गुन्हा नोंद केला होता. सदर गुन्ह्याच्या तपास वाशी पोलीस ठाणे येथील अधिकारी यांनी करुन तो गुन्हा पोलीस अधीक्षक धाराशिव यांनी दि.१८.०८.२०२५ रोजी सदर गुन्ह्याचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष धाराशिव यांच्याकडे वर्ग केला होता.

सदर गुन्ह्याचे तपासामध्ये पोलीस अधिक्षक श्रीमती शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, धाराशिव येथील अधिकारी व अंमलदार यांनी अतिशय सचोटीने तपास करुन, गुप्तबातमीदार मार्फत माहिती काढुन, तांत्रिक तपास करुन गुन्ह्यातील संशयित आरोपी व अपहरीत अल्पवयीन मुलीचा शोध घेतला. ते दोघेजण अहिल्यानगर शहरात असल्याची खात्री झाल्याने पथकाने दि.११.०९.२०२५ रोजी अपहरीत मुलगी व संशईत आरोपी सुनिल यांना अहिल्यानगर येथुन ताब्यात घेवून आज रोजी वाशी पोलीस ठाणे येथे हजर केले आहे.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, धाराशिवचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे यांचे आदेशाने पोलीस उपनिरीक्षक श्री. सोनटक्के, महिला पोलीस हावलदार- नदाफ, पोलीस हावलदार- केवटे, पोलीस नाईक माने, यांच्या पथकाने केली आहे. या प्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

# अणदूर येथे राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन

जळकोट (विजय पिसे)- जवाहर महाविद्यालय अणदूर येथील संस्कृत विभाग आयोजित विश्व संस्कृत दिनानिमित्त राज्यस्तरीय निबंधस्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. निबंधलेखनाचे विषय १) श्रीमद् भगवद्गीतेतून मिळणारे जीवनाचे शिक्षण २) वेदांचे महत्व ३)स्त्रीशिक्षणाचे महत्व हे विषय असून वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंधलेखन करुन प्रा. डॉ. सत्येंद्र राऊत यांच्या मो. नं. ८२०८७४०८८० या नंबरवर तसेच rautsatyendra07 gmail.com वर दि.२५ सप्टेंबरपर्यंत पाठवावे. निबंधलेखन कुठल्याही प्रकारचे कापी पेस्ट असू नयेत तसेच शब्दमर्यादा १५०० ते २००० असावी.

विजेत्या स्पर्धकांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल. असे प्रा.डॉ. सत्येंद्र राऊत यांनी आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी वरील नंबरवर संपर्क करावा.

# पोदार इंटरनॅशनल स्कूलचा १४ वर्षे वयोगटातील मुलींचा बास्केटबॉलचा संघ धाराशिव जिल्हा प्रथम क्रमांक मिळवत विभागीय स्पर्धेसाठी पात्र



धाराशिव (प्रतिनिधी)- श्री श्री रविशंकर विद्यामंदिर, धाराशिव येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धाराशिव. यांच्यावतीने घेण्यात आलेल्या शालेय बास्केटबॉल क्रीडा स्पर्धा २०२५ - २६ अंतर्गत १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या अंतिम सामन्यात पोदार इंटरनॅशनल स्कूल धाराशिव या संघाने जिल्हा प्रथम क्रमांक मिळवत विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला. या स्पर्धेसाठी पोदार इंटरनॅशनल स्कूल धाराशिव च्यावतीने १७ वर्षे वयोगटाखालील मुले व मुलींचा संघ तसेच १४ वर्षे वयोगटाखालील मुले व मुलींचा संघ सहभागी झाला होता. त्यामध्ये १७ वर्षे वयोगटा खालील मुलींच्या संघाने जिल्हा द्वितीय क्रमांक पटकावला व १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने जिल्हा प्रथम क्रमांक पटकावला तसेच मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. या घवघवीत यशाबद्दल पोदार इंटरनॅशनल स्कूल धाराशिव चे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांनी स्कूलच्या वतीने सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या संघासाठी स्कूलचे क्रीडाशिक्षक श्री विवेक महाजन सर यांनी मेहनत घेतली होती, त्यांचे देखील स्कूलच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

याप्रसंगी स्कूलचे उपप्राचार्य श्री निलेश जाधव सर, प्रशासकीय अधिकारी श्री जीवन कुलकर्णी सर, वरिष्ठ समन्वयक श्री प्रभाकर चौधरी, कार्यक्रमाधिकारी श्री अंकुश दीपक सर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात संघरत्न नगदे प्रथम



धाराशिव (प्रतिनिधी)-धाराशिव येथे आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित गुरूवर्य के. टी. पाटील फौंडेशन वर्ग व गुरूवर्य के. टी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन व स्पर्धेये आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत आठवी ते दहावी या गटात छत्रपती शिवाजी हायस्कूल येथील संघरत्न सुभाष नगदे या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. श्रीपतराव भोसले हायस्कूल येथे बुधवार, १० सप्टेंबर रोजी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील आठवीच्या वर्गातील विद्यार्थी संघरत्न सुभाष नगदे याने धान्याची स्वच्छता करण्याचे घरगुती यंत्र तयार करून विज्ञान प्रदर्शनामध्ये सर्व विद्यार्थ्यांसमोर सादर केले. या साधनामुळे घरातील धान्याची स्वच्छता करणे, धान्यातील बारीक खडे वेगळे करणे, धान्यातील धूळ बाजूला करण्याचे काम सहज आणि सोप्या रीतीने करता येते, असे प्रयोगांमधून निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या प्रयोगाची तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये प्रथम क्रमांकाने निवड करण्यात आली.

पारितोषिक वितरण कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील, अमोल पाटोदेकर, आंबेवाडीकर आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या मुख्याध्यापक, शिक्षकांनी नगदे यास मार्गदर्शन केले.

# पात्र व्यक्तींना कुणबी,मराठा - कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र देण्यासाठी गाव पातळीवर समित्या गठीत

धाराशिव (जिमाका) - महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाच्या आदेशानुसार कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी - मराठा जात प्रमाणपत्र देण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी गाव पातळीवर समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.या समित्यांमध्ये ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांचा समावेश आहे.शासन निर्णयानुसार अर्जदाराने तहसील कार्यालयात जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करताना खालील पुरावे सादर करणे आवश्यक आहे.

अर्जदार हा मराठा समाजातील भूधारक, भूमिहीन,शेतमजूर किंवा बटाईदार म्हणून जमीन शेती करत असल्याचा पुरावा.वडील व आजोबा पूर्वीचे रहिवासी असल्याचे प्रतिज्ञापत्र,१३ ऑक्टोबर १९६७ पूर्वीचे स्थानिक दाखले.अर्जदाराच्या गावातील/कुळातील नातेवाईकांना कुणबी जात प्रमाणपत्र मिळाल्याचा दाखला व अन्य आवश्यक पुरावे. तहसीलदार यांच्याकडे अर्ज सादर केल्यानंतर संबंधित समिती चौकशी करून अहवाल सादर करेल.

ग्रामपातळीवरील समिती गावातील ज्येष्ठ नागरिक,पोलिस पाटील आदींची मदत घेऊन पडताळणी करेल.त्यानंतर तहसीलस्तरीय समिती अंतिम निर्णय घेईल.शासनाच्या या निर्णयामुळे संबंधित नागरिकांना जात प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया सुलभ होणार आहे.

# महादेव कोळी जमातीला हैद्राबाद गॅझेट लागू करा

## मराठवाडा सकल आदिवासी कोळी-महादेव संघटनेची मागणी



धाराशिव(शीला उंबरे-पेंढारकर)-मराठवाड्यातील कोळी-महादेव, मल्हार-कोळी जमाती आरक्षणापासून वंचित आहे. त्यांना जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळत नाही. प्रमाणपत्र सुलभ पध्दतीने देण्यात यावे व मराठवाड्यातील आदिवासी कोळी-महादेव, कोळी -मल्हार जमातीसाठी हैद्राबाद गॅझेट लागू करावे, अशी मागणी मराठवाडा सकल आदिवासी कोळी-महादेव संघटनेने मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

जिल्हाधिकार्यामार्फत पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मराठवाड्यात महादेव-कोळी आणि मल्हार-कोळी या दोन जमाती आहेत. राज्य सरकारने मराठा समाजाला नुकतेच हैद्राबादचे गॅझेट लागू केले आहे. गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून मराठवाड्यातील कोळी-महादेव व मल्हार-कोळी या समाजाकडून हेद्राबाद गॅझेट लागू करण्याची मागणी होत आहे. मुळात तत्कालीन निजाम राजवटीतील मराठवाड्याच्या बालाघाट, महादेव, अजिंठा डोंगररांगा क्षेत्रात दोन्ही जमाती वास्तव्यास आहेत. छत्रपती संभाजीनगरसह आठ जिल्ह्यांसाठी दोन जात पडताळणी समित्या आहेत. रक्तनात्यात वडिलांची, काकांची, आत्याची, भावाची, चुलतभाऊ यापैकी वैधता झाली असेल तर अशा प्रकरणात पुन्हा गृहचौकशीची गरज नाही, असा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे. तरीही सर्रासपणे या दोन्ही जात पडताळणी समितीकडून जात पडताळणीचे प्रस्ताव अवैध ठरवली जात आहे. ही अन्यायकारक पध्दत बंद करून जात वैधता देण्यात यावी, हैद्राबाद गॅझेट लागू करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी मराठवाडा सकल आदिवासी कोळी महादेव संघटनेचे सिध्देश्वर कोळी व पंढरीनाथ कोणे यांच्यासह इतर पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# मुरूम, आलूरमध्ये ढगफुटीसदृश पावसामुळे पिके गेली पाण्यात



मुरूम (प्रतिनिधी)-मुरूम, बेळंब, केसरजवळगा, कोथळी, आलूर, वरनाळ, कंटेकुर परिसरात बुधवार व गुरुवारी पहाटेच्या सुमारास ढगफुटी सदृश पावसाने थैमान घातले. या पावसामुळे अनेकांच्या घरांमध्ये पाणी घुसले. तर अनेक शेतकऱ्यांच्या शेतामधील तूर, सोयाबीन, उडीद, ऊस या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मुरुमसह परिसराला जोरदार पावसाने झोडपले होते. तद्नंतर पुन्हा एकदा जोरदार पाऊस झाल्याने परिसरातील पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.

बुधवारी पहाटे पडलेल्या पावसाची ५२ मिलीमीटर इतकी नोंद झाली असून गुरुवारी पहाटे पडलेल्या पावसाच्या आकडेवारीची माहिती अद्याप मिळाली नाही. सलग दोन दिवस झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. शेतात पावसाचे पाणी साचल्यामुळे काढणीस आलेले उडीद, सोयाबीन पूर्णपणे नष्ट झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. ऊस पीक जमीनदोस्त झाले असून अनेक शेतकऱ्यांच्या शेतात ओढे व नाल्यांचे पाणी घुसल्याने बांध फुटून शेतातील माती खरडून गेली आहे. दरम्यान मुरूम मंडळ भाजपच्या वतीने या संपूर्ण भागातील शेतकऱ्यांच्या पिकांचा पंचनामा करून तसेच पडझड झालेल्या घरांचे सर्व्हे करून नुकसान भरपाई द्यावी अशा मागणीचे निवेदन उपविभागीय अधिकारी,तहसीलदार यांच्याकडे देण्यात आले आहे.

आलूर, वरनाळ गावातील घरात पाणी पावसामुळे आलूर तसेच वरनाळ गावातील अनेक नागरिकांच्या घरात पावसाचे पाणी घुसल्याने मोठ्या प्रमाणात संसारोपयोगी साहित्य भिजून नागरिकांचे नुकसान झाले आहे. अनेकांच्या घरांचे मातीच्या भिंती पडून घरे उघड्यावर आली आहेत.

बेणीतुरा दुथडी भरून वाहत आहे मुरूम, येनेगुर, जेवळी, आष्टा कासार, तुगाव, अंबर नगर, फुलसिंग नगर, बेळम भागात दोन दिवस झालेल्या पावसामुळे बेणीतुरा नदी दुथडी भरून वाहत आहे. यामुळे अनेक गावच्या पाण्याचा प्रश्न दूर झाल्याचे दिसून येत आहे.

# MahaSTRIDE उपक्रमातून उमरगा-लोहारा विकास आराखड्याला गती: आमदार पाटील यांच्या उपस्थित आढावा बैठक



धाराशिव (प्रतिनिधी)-उमरगा व लोहारा तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी चरहरडढठखङए उपक्रमांतर्गत उमरगा तहसील कार्यालयात आढावा बैठक पार पडली. शुक्रवार दि १२ रोजी पार पडलेल्या या बैठकीस मित्र संस्थेचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, माजी जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, अभय चालुक्य यांच्यासह प्रमुख प्रशासकीय अधिकारी, वरिष्ठ पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत तालुक्याच्या विकासासाठी विविध योजनांवर सविस्तर करण्यात आली. यात उमरगा तालुक्यासाठी चखऊ साठी अतिरिक्त जमीन उपलब्ध करून देणे, अचलबेट येथील धार्मिक पर्यटन स्थळाचा विकास करणे, उमरगा व लोहारा तालुक्यातील शैक्षणिक सुविधा वाढवण्यासाठी गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कॉलेज मागणी करण्यात आली याबरोबर येथे असलेल्या आयटीआय कॉलेज मध्ये विद्यार्थ्यांसाठी टेक्निकल इन्स्टिट्यूट सुरू करणे यांसारख्या महत्त्वपूर्ण मागण्या या बैठकीत मांडण्यात आल्या. या योजनांमुळे दोन्ही तालुक्याच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगतीला नवे बळ मिळणार असून स्थानिकांना रोजगारनिर्मितीची संधीही उपलब्ध होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. एकत्रित विचारमंथनातून विकासाच्या वाटचालीला गती मिळेल असा ठाम विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला. बैठकीत झालेल्या चर्चेतून उमरगा लोहारा तालुक्याच्या विकासाला निश्चितच नवीन दिशा मिळेल, अशी अपेक्षा उपस्थित भाजपा पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# मोटारसायकलची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गतफिर्यादी महेश गोरोबा घेघुले, वय २० वर्षे, रा. वडगाव लाख, ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची अंदाजे ४०,००० किंमतीची मोटरसायकल दि. ०८.०९.२०२५ रोजी तहसील कार्यालय तुळजापूर येथील पार्कींग येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-महेश घेघुले यांनी दि.१०.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# ₹२,२९,२५० ‘तडजोड शुल्क’वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.११ सप्टेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २७७ कारवाया करुन २,२९,२५० ‘तडजोड शुल्क’वसुल केले आहे.


**लातूर समाचार उस्मानाबाद**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649